# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा. क्र. 57/2024  दिनांक : 11.02.2024**

## 1)घरफोडी :–

**देगलूर :–** दिनांक 08.02.2024 रोजी 16.00 वा. ते दिनांक 09.02.2024 रोजी 09.00 वा. चे दरम्यान, **जिल्हा परिषद कन्या शाळा देगलूर ता. देगलुर जि.नांदेड येथे,** कोणीतरी अज्ञात चोरटयाने शाळेत प्रवेश करून भंडार गृहाचे घराचे कुलूप कोंडा तोडुन आत प्रवेश करून आतील पोषण आहाराचे तांदुळ 254 किलो असा एकुण किंमती 7110/–रूपयाचा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी बल्लीयोदीन अब्दुल हाबमुजावर, वय 55 वर्षे, व्यवसाय नौकरी मुख्याद्यापक जि.प.कन्या शाळा, देगलुर ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 57/2024 कलम 457, 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/580 तलवारे,** हे करीत आहेत.

## 2)चोरी :–

**1)इतवारा :–** दिनांक 09.02.2024 रोजी 15.15 वा. दरम्यान, **दत्त मंदिर होळी इतवारा, नांदेड येथे,** यातील मंदिराचे दान पेटीतील 4,000/–रूपये व मंदिरातील साहित्य 5,750/–रूपयाचे असा एकुण किंमती 9,750/– रूपयाचा मुद्देमाल यातील नमुद आरोपीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी प्रसेंजित प्रभुराम डोईफोडे, वय 42 वर्षे, व्यवसाय व्यापार रा. नरसिंग गल्ली इतवारा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 42/2024 कलम 380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री विलास पवार,** हे करीत आहेत.

**2)लोहा :–** दिनांक 10.02.2024 रोजी 01.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घराचे छतावर मौजे. कारेगाव ता. लोहा जि.नांदेड येथे,** यातील नमुद व इतर दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी यांचे घराचे छतावर घरबांधकामासाठी ठेवलेले गजाळीचे तीन बंडल एकुण किंमती 20,000/– रूपयाचा माल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी गंगाधर पुंडलिंक किरवले, वय 51 वर्षे, व्यवसाय शेती रा. कारेगाव ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 35/2024 कलम 379,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2325 किरपणे, मो.क्रं. 9881708474** हे करीत आहेत.

## 3)चंदन चोरी :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 10.02.2024 रोजी 12.40 वा. चे सुमारास, **नांदेड ते लोहा जाणारे रोडववर लातुर फाटा नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने शासनाने मनाई केलेल्या चंदनाच्या झाडाचे लहान तुकडे ओलसर 02.70 किलो वजनाचे एकुण किंमती 5400/– रूपयाचा माल विनापरवाना बेकायदेशीररित्या चंदनाची चोरी करून विक्री करण्यासाठी ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1926 गुंडेराव रघुनाथराव करले, ने. स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 108/2024 कलम 379 भादवी सह 41,42 भारतीय वन अधिनियम 1927 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/492 जाधव, मो.क्रं. 9011900345** हे करीत आहेत.

## 4)गंभीर दुखापत :–

**1)अर्धापूर :–**दिनांक 09.02.2024 रोजी 22.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे घरी नवी आबादी इंदिरानगर अर्धापूर ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस व त्यांचे भाऊ आई वडील यांना पत्नीची डिलेवरी झाल्याने इतके लवकर घरी सासरी बोलावण्याच्या कारणावरून आरोपीतांनी घरात घुसून फिर्यादीचे डोळयात मिरची पावडर टाकुन तलवारीने डोक्यात मारहाण केली. भांडण सोडविण्यासाठी आलेल्या फिर्यादीचे भावास तलवारीने डोक्यात मारून डोके फोडून गंभीर दुखापत केली, फिर्यादीचे वडिलास काठीने डाव्या हातावर मारहाण करून फॅक्चर केले, फिर्यादीचे आईस लाथाबुक्यानी मारहाण करून केस धरून जमिनीवर पाडले व गंभीर दुखापत करून जिवे मरण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी विलास उर्फ पंकज यादवराव साबळे, वय 32 वर्षे, व्यवसाय मिस्त्री रा. नवी आबादी इंदिरानगर अर्धापूर ता. अर्धापूर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरन 48/2024 कलम 452,326,325,324,323,504,506,34 भादवि सह 4/25 भारतीय हत्यार कायदा कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री रोठोड, मो.नं. 9823143245** हे करीत आहेत.

**2)विमानतळ :–**दिनांक 09.02.2024 रोजी 21.30 वा. ते 22.00 वा. चे सुमारास, **आनंदनगर चौक ते नाईकनगर चौकाकडे जात असताना गुंडेगावकर पेट्रोलपंपाचे समोर नांदेड येथे,** यातील फिर्यादी व साक्षीदार हे सायकल वर बसुन जात असताना त्यांचे पाठीमागुन यातील नमुद आरोपीने येवुन फिर्यादीस म्हणाला की तु माझा दुश्मण संतोष उर्फ चिंग्या याचे सोबत का राहतोस या कारणावरून शिवीगाळ करून झापडाने मारहाण केली व मोठा दगड घेवुन डाव्या पायाचे पिंढरीवर टाकुन पायाचे हाड मोडुन गंभीर दुखापत केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी मितेश परमेश्वर इंगळे, वय 20 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. शिवनगर, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे विमानतळ** गुरन 33/2024 कलम 325,323,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2305 आव्हाड, मो. नं. 9823350121** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**भाग्यनगर :–** दिनांक 17.10.2022 ते आज पावेतो, **दुल्लेशहा रहेमान नगर रहमानए मज्जीत सैलाब नगर खडकपुरा नांदेड ह.मु. पिरबुऱ्हाण नगर, नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस घरातील काम करण्याचे कारणावरून सतत शिवीगाळ व मारहाण करून गॅरेज टाकण्यासाठी तुझे माहेरहुन दोन लाख रूपये घेवुन ये म्हणुन शिवीगाळ करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 24 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 41/2024 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास मपोना/352 पवार,** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :–

**नांदेड ग्रामीण :–**दिनांक 10.02.2024 रोजी 05.30 वा. चे सुमारास, **योगेश बार समोर मुरूम टाकलेल्या रोडवर धनेगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या एक धारदार खंजर आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सत्तार मगदुम शेख, ने. नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 106/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2240 व्यवहारे, मो.नं. 9823827173** हे करीत आहेत.

## 7)प्रोव्हिबीशन :–

**1)अर्धापूर :–** दिनांक 10.02.2024 रोजी 16.30 वा. चे सुमारास, **जि.प.शाळेच्या पाठीमागे मोकळया जागेत कामठा बु. ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 4620/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/2144 सुरेश लक्ष्मणराव घुगे, ने. स्थागुशा, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 51/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **पोहेकॉ/1279 चव्हाण, मो.नं.9356283717** हे करीत आहेत.

**2)मरखेल :–** दिनांक 10.02.2024 रोजी 15.20 वा. चे सुमारास, **मौजे. लोणी ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या हातभट्टी गावठी दारू किंमती 2200/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/13 सचिन चंद्रकांत गिरे, ने. मरखेल** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरनं 19/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **पोहेकॉ/94 शेख, मो. नं. 7776067774** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड